सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /२०२१/3495 दिनांकः- 10 DEC 2021

प्रति,

प्राचार्य /संचालक,

शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,

पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,

नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंअतर्गत निधी वितरित करणेबाबत.

संदर्भ :- १) या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिस/शैवि/ईबीसी/Mahadbt/२०२१ / २६२/ दि. २२/०१/२०२१

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय ,म.रा.मुंबई, यांचे कार्यालयाचे पत्र क्र. १८ /तंशिसं/डिबीटी/विकाप/२०२१/३९२/ दि. १५/०९/२०२१

३) या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिस/शैवि/ईबीसी/Mahadbt/२०२१ / २५७४/ दि. १७/०९/२०२१

४) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय ,म.रा.मुंबई, यांचे कार्यालयाचे पत्र क्र. १८ /तंशिसं/डिबीटी/विकाप/२०२१/४६०/ दि. १७/११/२०२१

५) या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिस/शैवि/ईबीसी/Mahadbt/२०२१ / २७३२/ दि. १/१०/२०२१

६) या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिस/शैवि/ईबीसी/Mahadbt/२०२१ / २८०८/ दि. १२/१०/२०२१

७) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय ,म.रा.मुंबई, कार्यासन क्र. १८ यांचे दि. ०७/१२/२०२१ रोजीचा प्राप्त ई-मेल.

उपरोक्त विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजनांतर्गत विद्यार्थ्याचे अर्ज मंजूर करतेवेळी कोविड-१९ च्या काळात राज्यात टाळेबंदी सुरू होती. त्याकाळात खरच विद्यार्थी हा शिक्षणासाठी वसतिगृह किंवा पेंईगगेस्ट म्हणून राहत होता का ? याबाबतची शहानिशा करूनच अर्ज मंजूरीस्तव पुढे पाठविण्याबाबत आपणास निर्देश देण्यात आलेले होते. तथापि संदर्भिय पत्र क्र. ०१ व ०४ अंन्वये मंजूर झालेल्या संबंधित शिष्यवृत्तीच्या अर्जाची प्रत्यक्षात शहानिशा/चौकशी करण्याबाबतचे निर्देश या कार्यालयास प्राप्त झालेले असून त्याअनुषंगाने आपल्या कडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे चौकशी केली असता , टाळेबंदीच्या काळात वसतिगृह/ खाजगी ठिकाणां संबंधित, बरेच विद्यार्थ्यांनी तसेच संस्थेमार्फत सादर केलेली माहिती ही चुकीची अथवा खोटी सादर करून शासनाची दिशाभुल केल्याचे निर्दशनास आलेले आहे.

**तरी संदर्भिय क्र. ०७ अन्वये पुनःश्च संबंधित विद्यार्थ्यांची शहानिशा / चौकशी करावयांची असल्याने, सोबत जोडलेल्या विवरण पत्रात अचुक तीच माहिती भरुन (Excel Sheet मध्ये Soft व Hard Copy ) दि. १५/१२/२०२१ पर्यंत या कार्यालयाच्या ronagpur@dtemaharashtra.gov.in या ई-मेल वर प्रथम प्राधान्याने सादर करण्यात यावी.**

**तसेच ज्या संस्थेची माहिती दिलेल्या वेळेनंतर प्राप्त झाल्यास, त्या संस्थेतील विद्यार्थ्याना संबंधित शिष्यवृत्तीची रक्क्म नामंजूर करण्याबाबत वरीष्ठ कार्यालयास शिफारस करण्यात येईल. याची संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी.**

सहपत्र :- वरीलप्रमाणे

(डॉ. मनोज भा. डायगव्हाने)

प्र. सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

प्रत:-१) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय ,म.रा.मुंबई (कार्यासन क्र. १८) यांना माहितीकरिता सविनय सादर.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.

**Reverified -List of students under DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna 2020-21**

| Sr. no | Inst code | Institute Name | DBT Application no. | Name of student Applied for Dr. Panjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta | Stayed in Institute/ Private Accomodation/None | Number of months of stay in Institute Hostel/Private Accomodation | Recommended / Non Recommended for Allowance |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

Principal sign & Stamp